# वाचलेच पाहिजे असे काही - भाग ३

## (संकीर्ण)



संपादन

जयश्री काटीकर

एकदा लहानपणी
पुस्तकांशी मैत्री झाली की,
ती संगत कधीही सुटत नाही.
जीवनातले अनुभव
अधिक डोळसपणे घेण्याची शक्ती
पुस्तकं आपल्याला देतात;
आपलं व्यक्तिमत्त्व अधिक सुजाण,
संपन्न करतात.
परंतु नेमकं काय वाचावं
हे आपल्याला समजत नसतं.
या पुस्तकात मराठी साहित्यातील ललित,
प्रवासवर्णन, भटकंती इ.
साहित्य प्रकारांचा समावेश असलेल्या पंचवीस
पुस्तकांचा परिचय करून दिला आहे.
सोबत वाचनीय अशा
पन्नास पुस्तकांची यादीही आहे.
एखाद्या पुस्तकातील
सौंदर्याचा आस्वाद कसा घेता येतो;
ही दृष्टी कुमारवयातील वाचकांना मिळावी
हा या पुस्तकाचा हेतू !

छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ ४०

# वाचलेच पाहिजे असे काही

## भाग - ३

## (संकीर्ण)

संपादन
जयश्री काटीकर

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411 030
www.chhatraprabodhan.org

**‘वाचलेच पाहिजे असे काही भाग – ३’**
(‘वाचलेच पाहिजे असे काही’ या ‘छात्र प्रबोधन’मधील सदरात प्रकाशित झालेल्या निवडक संकीर्ण पुस्तक–परिचयांचा संग्रह)

❖ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, ‘छात्र प्रबोधन’,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175
email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

❖ **अक्षरजुळणी**
छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

❖ **मुखपृष्ठ**
दीपाली पाटवदकर

❖ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर अग्रहायण, शके १९४१, डिसेंबर २०१९
© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन
❖ **किंमत**
₹ ४०

***'Vachlech Pahije Ase Kahi part-3'***
***(Reviews of some selected books in Marathi Literature)***
(‘छात्र प्रबोधन’ मासिकात १९९१ ते २०१८ या कालावधीत प्रसिद्ध झालेले काही पुस्तक–परिचय या पुस्तकात पुनर्मुद्रित केले आहेत.)

# प्रस्तावना

अनुभवसंपन्न, ज्ञानसंपन्न होण्यासाठी माणसानं सतत 'वाचतं' राहिलं पाहिजे. आता पूर्वीची परिस्थिती बदलली. पुस्तकं online सुद्धा उपलब्ध होऊ लागली. टी.व्ही., मोबाईल, सोशल साईट्स यांच्या गदारोळातही वाचनाचे स्रोत भरपूर प्रमाणात आज उपलब्ध आहेत. त्याचाही फायदा आपण करून घ्यायला हवा. वाचनाला पर्याय नाही, हे खरेच ! पण आताच्या माहिती तंत्रज्ञानाच्या आणि विशेषत: माहितीच्या विस्फोटाच्या परिस्थितीत नेमकं काय वाचावं, सकस-अभिरुचीपूर्ण पुस्तकांची निवड कशी करावी, हे कळत नाही. त्यासाठीच 'वाचलेच पाहिजे असे काही' या पुस्तकांची रचना करण्यात आली.

'छात्र प्रबोधन'च्या २५ वर्षांच्या वाटचालीत जवळजवळ १००-१२५ पुस्तकांचा परिचय आपण मुलांना करून दिला, ही अर्थातच जमेची बाब ! या लेखांमध्ये काही नवीन पुस्तकांचा परिचय करून देणाऱ्या लेखांची भर घालून 'वाचलेच पाहिजे असे काही' या पुस्तकाच्या तीन भागांचे नव्याने संपादन केले आहे. त्यांत विविध वाङ्मय प्रकारातील कुमारांनी आवर्जून वाचावीत अशा निवडक पुस्तकांची ओळख करून दिली आहे.

त्यातील पहिले दोन भाग यापूर्वीच प्रकाशित झाले आहेत. पहिल्या भागात प्रेरक अशा २५ चरित्र-आत्मचरित्रांचा समावेश आहे. दुसऱ्या भागात अनुभवविश्व समृद्ध करणाऱ्या अशा २५ कथा-कादंबऱ्यांचा परिचय आहे तर तिसऱ्या भागात संकीर्ण स्वरूपाच्या पुस्तकांचा परिचय करून देताना आम्हाला आनंद होत आहे.

'वाचलेच पाहिजे...' च्या या तिसऱ्या भागात तुम्हाला ललित, माहितीपर, प्रवासवर्णनं, भटकंती, नाटकं, काव्यसंग्रह अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील पुस्तकांचा परिचय करून दिला आहे. या वेगवेगळ्या साहित्यप्रकारातील अशा काही २५ पुस्तकांची निवड करणं, ही खरंच तारेवरची कसरत होती. अनुभवपर, व्यक्तिचित्र, चिंतनपर इथपासून काही वैचारिक, शैक्षणिक, पर्यावरणीय, समाजशास्त्रीयदृष्ट्या काही सांगू पाहणाऱ्या पुस्तकांची निवड या तिसऱ्या भागासाठी केली. प्रत्येक साहित्य प्रकाराची शैली-धाटणी किती वेगवेगळी याची जाण तुम्हाला यावी आणि एकंदरीतच मराठी साहित्याचे विस्तीर्ण दालन यानिमित्ताने तुमच्यासाठी खुले व्हावे, हाच या निवडीमागचा उद्देश आहे; पण तरीही ही निवड परिपूर्ण नाही याचीही जाणीव मनात आहेच. त्यामुळेच कुमारांनी जरूर वाचावीत अशा पन्नास पुस्तकांची यादीही यासोबत देत आहोत. त्यात अजूनही सतत भर पडत राहणारच, यात शंका नाही.

**- जयश्री काटीकर**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | खारीच्या वाटा | ल. म. कडू | ५ |
| २. | निसर्गोत्सव | दुर्गा भागवत | ७ |
| ३. | पूर्वरंग | पु. ल. देशपांडे | ९ |
| ४. | दोस्त | अनु. चेतना सरदेशमुख, मीना आशिझावा | ११ |
| ५. | आसमंत | श्रीकांत इंगळहळीकर | १३ |
| ६. | तोत्तोचान | अनु. चेतना सरदेशमुख | १५ |
| ७. | विशाखा | कुसुमाग्रज | १७ |
| ८. | माणसं! | अनिल अवचट | १९ |
| ९. | रायगडाला जेव्हा जाग येते | वसंत कानेटकर | २१ |
| १०. | कैफियत | राजन गवस | २३ |
| ११. | छंदांविषयी | अनिल अवचट | २५ |
| १२. | व्यक्ती आणि वल्ली | पु. ल. देशपांडे | २७ |
| १३. | एका रानवेड्याची शोधयात्रा | कृष्णमेघ कुंटे | २९ |
| १४. | दक्षिणरंग | मीना प्रभु | ३१ |
| १५. | कथा इस्रोची | वसंत गोवारीकर | ३३ |
| १६. | घाणेरीची फुलं | संपा. रामनाथ चव्हाण | ३५ |
| १७. | पुण्यभूमी भारत | सुधा मूर्ती | ३७ |
| १८. | प्रिय बाई | अनु. सुधा कुलकर्णी | ३९ |
| १९. | बकुळफुलं | संपा. शिल्पा कुलकर्णी | ४१ |
| २०. | वीज म्हणाली धरतीला | वि. वा. शिरवाडकर | ४३ |
| २१. | निसर्गायण | दिलीप कुलकर्णी | ४५ |
| २२. | जिद्दीची लोभस रूपे | संपा. बागेश्री पोंक्षे | ४७ |
| २३. | माँटुकले दिवस | संदेश कुलकर्णी | ४९ |
| २४. | एक पानी आरस्पानी | आश्लेषा महाजन | ५१ |
| २५. | हट्टी व्हा, हट्टी | संपा. माधवी दाबक | ५३ |